प्रेरणादायी कथा

# वेगळेपणातून उमललेलं सुंदर जग

एका छोट्या गावात आर्यन नावाचा एक मुलगा राहत होता. आर्यन इतर मुलांसारखा नव्हता. तो खूप शांत असायचा, लोकांशी फार बोलत नसे आणि कधी कधी एका खेळण्यात किंवा रंगांमध्ये तासन्तास रमून जायचा. शाळेतले काही मुले त्याला समजून घेत नव्हती, म्हणून त्याला एकटं वाटायचं. पण त्याच्या आई-वडिलांना माहीत होतं की आर्यन वेगळा असला तरी तो खूप खास आहे.







डॉक्टरांनी सांगितले की आर्यनला Autism Spectrum Disorder आहे. सुरुवातीला कुटुंबाला काळजी वाटली, पण त्यांनी हार मानली नाही. त्यांनी आर्यनला प्रेम, संयम आणि योग्य थेरपी देण्याचा निर्णय घेतला. हळूहळू आर्यनच्या आयुष्यात बदल दिसू लागले. तो चित्र काढण्यात खूप रमू लागला. त्याने रंगांमधून आपलं मन व्यक्त करायला सुरुवात केली.

एक दिवस शाळेत चित्रकला स्पर्धा झाली. आर्यनने निसर्गाचं खूप सुंदर चित्र काढलं. त्या चित्रात झाडं, पक्षी आणि आकाश इतकं जिवंत वाटत होतं की सगळे थक्क झाले. शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी त्याचं कौतुक केलं. ज्या मुलांना तो आधी समजत नव्हता, त्यांनाही आता जाणवलं की आर्यनमध्ये एक खास प्रतिभा आहे.

त्या दिवसापासून आर्यन फक्त “वेगळा मुलगा” राहिला नाही, तर “प्रेरणा देणारा मुलगा” बनला. त्याच्या कुटुंबाने आणि शिक्षकांनी एक गोष्ट शिकवली—प्रत्येक मुलामध्ये काहीतरी खास असतं. कधी कधी ते समजून घेण्यासाठी फक्त प्रेम, संयम आणि विश्वास लागतो.





**ऑटिझम असलेली मुले कमकुवत नसतात. त्यांची दुनिया फक्त थोडी वेगळी असते. आपण जर त्यांना समजून घेतलं, साथ दिली आणि प्रोत्साहन दिलं, तर तीही आपल्या कर्तृत्वाने समाजाला प्रेरणा देऊ शकतात. प्रत्येक मुलाला स्वीकारणे आणि त्याला फुलू देणे हीच खरी मानवतेची ओळख आहे.**

तुम्हाला माहिती आहे का ?

# ऑटिझम म्हणजे काय, आई-बाबांनी आपल्या बाळाचं कसं निरीक्षण करावं ?

आपण ऑटिझम हा शब्द अनेकदा ऐकतो. ऑटिझम या आरोग्य स्थितीबद्दल आपण येथे जाणून घेणार आहोत. ऑटिझमचं पूर्ण नाव ऑटिझम स्पेक्ट्रम डिसॉर्डर असं आहे. याला ऑटिझम स्पेक्ट्रम कंडिशन असंही म्हणतात. याची तीव्रता व्यक्तीनुरुप बदलते. ऑटिझम असणारी व्यक्ती त्यांच्याआजूबाजूच्या स्थितीला कसा प्रतिसाद देते, कसा संवाद साधते, कसे वागते यानुसार त्यात फरक पडत असतो.

हा कोणताही आजार नाही तर ती एक जन्मतःच मिळालेली आरोग्याची स्थिती असते. ही स्थिती दीर्घकाळ राहाते.एखाद्या व्यक्तीला फक्त पाहून तिला ऑटिझम आहे की नाही हे सांगता येत नाही. मुलांना जन्मतःच ऑटिझम कस। असतो याचं कारण माहिती नसलं तरी त्यावर भरपूर संशोधन झालेलं आहे.

## ऑटिझमचा लोकांच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो ?

- **ऑटिझमचा परिणाम व्यक्तीनुरुप वेगवेगळया प्रकारे बदलत असल्यामुळे त्याचं निदान करण्यास वेळ जातो. त्याच्या लक्षणांची ठोस अशी यादी नाही. तरीही काही लक्षणांकडे लक्ष देता येईल.**
- ऑटिझम असणाऱ्या व्यक्तीला इतरांशी संवाद साधण्यात अडथळा येऊ शकतो
- इतर लोक कसा विचार करतात किंवा त्यांना काय वाटतं हे समजण्यात त्यांना अडथळे येऊ शकतात.
- प्रखर उजेड किंवा गोंगाटाचा त्यांना वाजवीहून जास्त त्रास होऊ शकतो, अशा स्थितीत त्यांना अस्वस्थ वाटतं
- नव्या घटना किंवा सामाजिक कार्यक्रमांमध्ये ते गोंधळू शकतात, त्यामुळे अस्वस्थ होऊ शकतात.
- काही गोष्टी समजण्यासाठी जास्त वेळ लागू शकतो
- काही गोष्टी ते वारंवार करतात किंवा एकच विचार वारंवार करतात.

ऑटिझमबद्दल माहिती देताना युनायटेड किंग्डमची आरोग्यसेवा एनएचएस सांगते, “ऑटिझम हा आजार नाही. ऑटिस्टिक असणं म्हणजे तुम्हाला काही आजार, रोग नाही. ऑटिझम असणाऱ्या लोकांचा मेंदू इतरांपेक्षा वेगळ्याप्रकारे काम करतो. त्याची लक्षणं अगदीच जास्त काही चुकत असेल तर लक्षात येतात. ऑटिझम आयुष्यभर राहातो. ही काही वैद्यकीय स्थिती नसल्यामुळे त्यावर उपचार करुन बरं वगैरे करणं असा भाग नसतो तर अशा व्यक्तींना मदत काही गोष्टी करण्यासाठी मदतीची गरज असते.”



